महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ९० वा | दिनांक : ०४/०१/२०२५ | वार : शनिवार

## संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपींचे एन्काऊंटर करा : आमदार खोत



बीड : सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील गुन्हेगारांना न्यायालयातून फाशीची शिक्षा होईपर्यंत वाट पाहण्यात थांबण्यापेक्षा अशा या फाळकुट दादांना भर चौकात गोळ्या घालून त्यांचे एन्काऊंटर करायला हवे. म्हणजे राज्यांमध्ये अशा प्रकारचे गुन्हेगारी डोके वर काढणार नाही. अशी मागणी शेतकरी नेते आमदार सदाभाऊ खोत यांनी केज तालुक्यातील मस्साजोग येथे केली.

शुक्रवारी शेतकरी नेते आमदार सदाभाऊ खोत यांनी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी सदाभाऊ खोत म्हणाले की, गुन्हेगारांना कोणीही राजाश्रय देऊ नये. या हत्या प्रकरणातील गुन्हेगार राजकीय नेत्यांचे निकटवर्तीय असल्याने यावर त्यांनी स्पष्ट बोलणे टाळले. तरीही राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखायला हवे. या हत्या प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सक्षम नेतृत्व असून ते देशमुख हत्या प्रकरणाची सखोल चौकशी करीत आहेत.

सामान्य गुन्ह्यामध्ये पोलीस ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे, त्यांच्या नातेवाईकांची चौकशी करतात. मात्र एवढ्या गंभीर गुन्ह्यात गुन्हेगारांच्या नातेवाईकांची देखील चौकशी व्हायला हवी. अशी मागणी ग्रामस्थांनी सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर कुटूंबीयांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून विशेष बाब म्हणून 10 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. शुक्रवारी 10 लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांच्याकडे सुपूर्द केला.

## रॉबर्ट वाड्रा शिमल्याच्या हनुमान मंदिरात पोहोचले



**शिमला** : काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि वायनाडच्या खासदार प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा शुक्रवारी शिमल्याच्या प्रसिद्ध हनुमान मंदिर जाखूमध्ये पोहोचले. येथे त्यांनी विशेष पूजा-अर्चना केली. यादरम्यान रॉबर्ट वाड्रा म्हणाले की, मी अनेकदा शिमल्यात येतो.

हे आमचे घर आहे. वाड्रा म्हणाले, जाखू मंदिरात येऊन दर्शन घेणे त्यांच्यासाठी खूप महत्त्वाचे होते. त्यांनी स्वतः, प्रियंका, मुले आणि संपूर्ण कुटुंबासह संपूर्ण देशासाठी प्रार्थना केली. त्यांच्यामध्ये बंधुभाव टिकून राहावा अशी त्यांची इच्छा आहे.

वाड्रा म्हणाले, देशात धर्माचे राजकारण होता कामा नये. मशिदींमध्ये होणाऱ्या सर्वेक्षणाच्या विरोधात आहे. आपण आपल्या देशातील प्रत्येकाचा आदर केला पाहिजे.

वीर सावरकरांच्या नावावरून दिल्ली विद्यापीठाच्या महाविद्यालयाचे नाव देण्यावरून निर्माण झालेल्या वादाशी संबंधित प्रश्नावर वाड्रा म्हणाले की दिवंगत माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे उच्चशिक्षित आणि चांगले पंतप्रधान होते. आर्थिक सुधारणा आणि आण्विक करारासाठी ते स्मरणात राहतील. विद्यापीठाला डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव देण्याची योजना असेल तर त्याचा आदर करू.

रॉबर्ट वाड्रा म्हणाले की, राहुल आणि प्रियंका देशात खूप मेहनत घेत आहेत. सर्वांना सोबत घेण्याचे राजकारण ते करत आहेत. गांधी परिवार भेदाचे राजकारण करत नाही. प्रियंका खासदार झाल्या असून महिला, शेतकरी आणि समाजातील सर्व वंचित घटकांच्या सुरक्षेसाठी संसदेत आवाज उठवत राहतील, अशी आशा त्यांना आहे.

प्रियंका गांधी ३ दिवसांपूर्वी शिमला येथे पोहोचल्या होत्या, तर रॉबर्ट वाड्रा आणि त्यांची मुले ५ दिवसांपूर्वी शिमला येथे पोहोचली होती. दरम्यान, वाड्रा आज जाखू मंदिरात पोहोचले. प्रियंका गांधी यांनी शिमल्यापासून १४ किलोमीटर अंतरावर असलेल्या छाराबरा येथे पहाडी शैलीत घर बांधले आहे.

## मानवी अधिकाराच्या मूल्याची स्थापना फुले दाम्पत्यांनी केली : डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे** : महिलांचे अधिकार म्हणजेच मानवी अधिकार आणि मानवी अधिकार म्हणजेच महिलांचे अधिकार आहेत आणि याची स्थापना महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी त्याकाळी केली. संयुक्त राष्ट्रसंघ आज जगामध्ये हेच मानवी मूल्य रुजवण्याचे काम करतोय ते काम या दाम्पत्यांनी त्याकाळी केले, असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका असलेल्या सावित्रीबाई फुले यांच्या 194 व्या जयंती निमित्त त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतांना त्या बोलत होत्या. यावेळी विद्यापीठाच्या मुख्य इमारती समोरील सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास डॉ. नीलमताई गोऱ्हे, उपसभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रविंद्र शिंगणापुरकर, बागेश्री मंठाळकर, डॉ. सागर वैद्य, ज्योत्स्ना एकबोटे, प्रभारी कुलसचिव प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे, अधिष्ठाता प्रा. (डॉ .) विजय खरे , वित्त व लेखा अधिकारी सीएमए डॉ.चारूशीला गायके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे, विद्यापीठ अधिकार मंडळाचे सदस्य, अधिसभा सदस्य आदींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

समाजाला जातीभेद, वंशभेद, स्त्री - पुरुष भेद या सगळ्या भेदाभेदांची टोचणी वाटण पुरेसे नसते तर त्यासाठी काहीतरी कृती करावी लागते असा संदेश सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी आयुष्भर दिला आहे. त्यामुळे प्रत्येकाने तशी कृतिशीलता आपल्यात निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी सामाजिक सुधारणांसाठी केलेल्या कार्यांना जसा सर्व जाती जमातीमधील काही लोकांचा विरोध होता तसेच या कार्यात त्यांना मदत करणारे लोकही सर्व समाजातील होते. त्यामुळे समाजात वैचारिक सहिष्णुता निर्माण होणे गरजेचे आहे, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पुढे बोलतांना सांगितले.

सावित्रीबाई फुले ह्या पहिल्या शिक्षिका तर होत्या परंतु त्या एक उत्कृष्ट शिक्षणतज्ज्ञही होत्या. मुलांनी शिक्षण सोडू नये यासाठी त्यांनी त्याकाळी स्टायफंड सुरु केले होते. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ त्यांचा वसा कायम जपत आहे व यापुढेही जपत राहील आणि त्यांचा वसा जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जानेवारी २०२५


# रा.से.यो. शिबिर अंतर्गत आरोग्य शिबीर संपन्न




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मुरूम यांच्या वतीने मौजे गणेश नगर येथे राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिर संपन्न होत आहे यामध्ये ग्रामीण रुग्णालय मुरूम व कला, वानिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर घेण्यात आले यावेळी उपस्थित स्वयंसेवक व गावातील नागरिक यांची आरोग्य तपासणी करण्यात आली यामध्ये एकुण ८५ नागरिकाचे रक्त गट, सीबीसी एच. बी.एस. ए. जी. व एच. आय. व्ही.व बीपी शुगर विविध आजाराची तपासणी करून उपचार करण्यात आले.

या वेळी कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले ग्रामीण रुग्णालय मुरूम चे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरदाळे सर व प्रयोग शाळा तंत्रज्ञ विजय भोसले, समुपदेशक सुजित जाधव, पुष्पा गोरे, उमेश लोखंडे NSS कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन उपासे, प्रा किसन माने, प्रा शेषराव राठोड प्रा.बालाजी इंगोले प्रा रोहन हराळकर प्रा विनय इंगळे प्रा वर्षा हुलगुंडे आदी उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# जैतखेडा येथे शनिवार पासुन भव्य अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन



**कन्नड : (अरुण थोरात) :** जैतखेडा ता.कन्नड येथे श्रीराम मंदीर मंदीर प्रांगणात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.यात दैनंदिन कार्यक्रम काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथाभजन, संगीत भागवत कथा, हरिपाठ, हरिकिर्तन, परिसरातील भजनी मंडळ यांचे हरिजागर राहणार आहेत.

ज्ञानेश्वरी पारायण ह.भ.प. कृष्णा महाराज निकम (गंगापुर) यांचे राहणार आहे तर संगीत भागवत कथा ह.भ.प.कृष्णाजी (शास्त्री) गायकवाड महाराज यांचे असुन.यातशनिवार दि४ जानेवारी रोजी ह.भ.प.कृष्णा महाराज चव्हाण (वारकरी शिक्षण संस्था हतनुर ) यांचे किर्तन. दि.५ रोजी ह.भ.प.धनश्री दिदी पवार (बालकिर्तनकार आळंदी).सोमवार दि.६ रोजी ह.भ.प.शिवचरित्रकार साध्वी दुर्गा दिदी बिडकीन. दि. ७ रोजी ह.भ.प.रामेश्वर महाराज भवर (पैठण). बुधवार दि. ८ रोजी ह.भ.प. संतोष महाराज आढावणे (कुंभारी, जालना) गुरुवार दि.९ रोजी ह.भ.प. माधव महाराज दैठणकर यांचे तर दि.१० रोजी ह.भ.प. युवराज महाराज देशमुख आळंदी यांचे किर्तन होणार आहे. दि.११ रोजी सकाळी ८ ते १०या वेळेत गावातुन ग्रंथदिंडी मिरवणूक काढण्यात येणार असून सकाळी ठिक १० ते १२ या वेळेत ह.भ.प. युवराज महाराज देशमुख (आळंदी) यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे, तरी परिसरातील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन समस्त ग्रामस्थ जैतखेडा व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

सप्ताह कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील नामवंत गायक, वादक, किर्तनकार महाराज मंडळी, साधु संत, महंत उपस्थित राहणार असुन, श्री विश्वमाई वारकरी शिक्षण संस्था बहीरगाव-कन्नड,श्री.संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी संस्था हतनुर, श्री.पांडुरंग वारकरी शिक्षण संस्था डोणगाव, सद्गुरू सेवा धाम गोशाळा जैतखेडा, आदींचे सहकार्य लाभणार आहेत. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी कार्यक्रमात सहभाग घ्यावा असे आवाहन जैतखेडा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्पायडर फ्रौग : बनोटी येथे आढळला दुर्मिळ गोल्डन ट्री बेडूक





**कन्नड (अरुण थोरात);** बनोटी ता. सोयगाव येथे आढळला भिंतीवर लिलया चढणारा दुर्मिळ "गोल्डन ट्रि फ्रॉग" आढळून आल्याने त्याची नोंद झुलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया च्या पोर्टल वर राज्यातून प्रथमतः करण्यात आल्याने पर्यावरण प्रेमी, संशोधक, अभ्यासकांनी आनंद व्यक्त केला आहे.

बनोटी येथील हार्डवेयर चे व्यापारी सुनील पाटील यांच्या हिवरानदी काठी असलेल्या घरी ईलक्ट्रिक वॉटर गिझर नादुरुस्त झाले होते. सदर गिझर दुरुस्त करण्यासाठी सिल्लोड येथील गिझर चे सर्व्हिस देणारे सतीश साळवे हे बनोटी येथे गेले असता, त्यांना गिझर च्या टपावर पूर्वी कधीही न पाहिलेला सोनेरी रंगाचा ४ ते ५ इंच लांब बेडूक दिसला.

गिझर हे जमिनीपासून ९ फूट उंचीवर असल्यामुळे हा बेडूक इतका वर चढून कसा गेला असावा अशी शंका निसर्ग प्रेमी असलेल्या साळवे यांना आली म्हणून त्यांनी लगेच आपले मित्र व सिल्लोड येथील पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांना व्हिडीओ कॉल केला व फोटो पाठविले. व्यवस्थित निरीक्षणाअंती डॉ.पाटील यांना हा दुर्मिळ बेडूक "गोल्डन ट्रि फ्रॉग" असल्याचे लक्षात आले, त्यांनी साळवे यांना या बेडकाला खाली उतरवण्यास सांगून व परत भिंतीजवळ ठेवण्यासाठी सांगीतलें असता, हा बेडूक परत सहज भिंतीवर चढू लागला.

नंतर या बेडकास बाहेर अधिवासात मुक्त करण्यात आले.

जैवविविधता संवर्धनासाठी याची नोंद झुलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया या वन्यजीवांच्या आढळ स्थितीबाबत केंद्र स्तरीय असलेल्या संस्थेच्या पोर्टल वर डॉ. संतोष पाटील यांनी राज्यातून ही प्रथम नोंद केली आहे.

पायाची रचना वैशिट्यपूर्ण :- या प्रजातीचे शास्त्रीय नाव पॉलीपेडेट्स ल्यूकोमिस्टस (polypedetus leucomistus) असे असून याच्या तळव्यावर असणाऱ्या म्यूकोसल ग्रंथी तुन स्त्रावणाऱ्या चिकट म्यूकस (स्लेष्मा), कॅपिलरी व हायड्रोडाय ना मिक दाब यामुळे हा बेडूक, भिंतीवर, झाडांवर, सहज चढू व उतरू शकतो. रक्तवाहिनीच्या दाबामुळे ही प्रक्रिया नियंत्रित होते.

याची त्वचा नरम व गुळगुळीत असते.कोळी (स्पायडर) स्वरूप लहान कीटक, किड, पिकांना त्रासदायक ठरणार्या गोगलगाय आदींवर हा उपजिविका करून जैविक अन्नसाखळीत महत्त्वाची भुमीका बजावतो. झाडे, गवताळ जागा, झुडूपे अशा दमट जागी उगवणारे गवत या ठिकाणी हा बेडूक अधिवास करीतो. जलप्रदूषण, हवामान बदल यामुळे यांची संख्या खुप कमी झाली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जानेवारी २०२५


# महानगरपालिकेचे वर्ग ०१ ते ०३ व ०४ संवर्गातील एकूण २४ कर्मचारी सेवनिवृत्त



**औरंगाबाद :** महानगरपालिकेचे वर्ग ०१ ते ०३ व ०४ संवर्गातील एकूण २४ अधिकारी कर्मचारी नियत वयोमानाने ३१ डिसेंबर रोजी सेवनिवृत्त झाले आहेत. मनपा मुख्यालय येथे मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास मा.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील,शहर अभियंता ए.बी देशमुख, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ पारस मंडलेचा,उप आयुक्त राहुल सूर्यवंशी, लखीचंद चव्हाण, यांची उपस्थिती होती.सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचारी यांना सेरोमोनियल कॅप, शॉल, पुष्पगुच्छ, सेवा प्रमाणपत्र व सामान्य भविष्य निर्वाह निधीचा धनादेश देण्यात आला. मा.आयुक्त महोदयांनी सर्व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांना पुढील आनंदी ,स्वस्थ निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सेवा निवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचारी यात अनुक्रमे वर्ग ०१ ते ०३ अंतर्गत उप अभियंता सुहास जोशी, वरिष्ठ लिपिक कांतीलाल थोरात, अखिल अहमद, सहशिक्षिका साजेदा बेगम, सय्यदा शाहिदा परवीन, सय्यदा मसीहा बेगम, वाहन चालक अब्दुल हमीद यांचे सह वर्ग ०४ अंतर्गत १७ कर्मचारी यात १० सफाई मजूर यांनी स्वच्छ निवृत्ती घेतली यात संजय बोर्डे, आशाबाई भुजंगे, सरस्वतीबाई उमप, सतीश पाईकडे, गिरधारी खरात, कचरू थोरात, बाळू लांडगे, शोभाबाई थोरात, सुनंदा उमप, विमलबाई चावरिया यांचा समावेश आहे.

तसेच पुरुष मजूर ०१ महेबूब खान, पाणीपुरवठा मजूर ०२ अनंत गवई, शेख युसुफ, पशुधन मजूर ०२ सत्यभागाबाई खरात, हाफिजा बी शेख फजल,व सफाई मजूर ०१ राजेंद्र गायकवाड नियत वयोमानाने सेवा निवृत्त झाले आहेत.या कार्यक्रमास सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचे कुटुंबीय यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू यांनी केले.

# सुशीलादेवी देशमुख विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**छ. संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी.जे. पहिलवान हे होते तर प्रमुख पाहूण्या म्हणून श्रीमती अर्चना गुमास्ते या होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या श्रीमती गुमास्ते यांनी सावित्रीबाईंचे कार्य विद्यार्थ्यांना परिचीत करून दिले. शेवटी श्री. पहिलवान यांनी अध्यक्षीय समारोप केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रावणी औटी व कु. अनुष्का बोर्डे यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. अनुष्का बोर्डे हिने केले.या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.






# 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' शिवाजी महाविद्यालयात शुभारंभ





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** दि २ जानेवारी-महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान सुरू झाला आहे. या उपक्रमांचा शुभारंभ उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रविण स्वामी यांच्या शुभहस्ते ग्रंथ प्रदर्शनाने झाला.

आधुनिक पिढी घडण्यासाठी वाचन चळवळ ग्रामीण भागात पोहोचवण्याचे कार्य श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने हाती घ्यावे.

शहरातील आणि गावातील ग्रंथालय आणि युवकांनी शासनाचा वाचन संकल्प यशस्वी करण्यास पुढाकार घ्यावा. असे आवाहन आमदार स्वामी यांनी केले.डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा यांच्या संयुक्त १ ते १५ जानेवारी दरम्यान या उपक्रमांतर्गत ग्रंथालय आणि वाचक याना जोडण्यासाठी तसेच वाचन संस्कृती वाढवण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन विद्यार्थी, प्राध्यापक आणि सर्वसामान्य लोकांसाठी केले जाणार असल्याचे प्रतिपादन वाचन संकल्प महाराष्ट्र उपक्रमाचे विद्यापीठ नियुक्त धाराशिव जिल्हा समितीचे सदस्य, प्राचार्य डॉ संजय अस्वले यानी केले आहे.

या उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक पुस्तक वाचन, पुस्तक लेखन आणि कथन स्पर्धा, लेखक-वाचक कार्यशाळा आणि बक्षिस वितरण व समारोप असे विविध उपक्रम महाविद्यालय आणि गावा-गावा मध्ये राबविण्यात येणार आहेत. ग्रंथालयाच्या वतीने दुर्मिळ अशी संस्कार, मूल्य रुजवनारी ग्रंथ, पुस्तके प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली. विद्यार्थी प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यानी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यासाठी ग्रंथपाल डॉ बी. व्ही चालुक्य, श्री एस एस जगताप यानी पुढाकार घेतला. यावेळी उपप्राचार्य डॉ व्ही एस इंगळे, प्रा. जी एस मोरे, प्रा. एस ए. महामुनी, प्रा. व्ही एन हिस्सल समितीचे सदस्य उपप्राचार्य डॉ पी ए पीटले , डॉ व्ही डि देवरकर, डॉ एस पी इंगळे, डॉ जी एन सोमवंशी, डॉ. डि एस चितमपल्ले, डॉ चालुक्य आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जानेवारी २०२५


# लिंगायत समाजाच्या अधोगतीला राजकीय नेते व धर्मगुरू जबाबदार - प्रा.सुदर्शनराव बिरादार





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** लिंगायत महासंघाच्या जळकोट तालुक्याच्या वतीने अतनुर येथे लिंगायत समाज बांधवांची एक महत्त्वाची बैठक दिनांक१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी एक वाजता लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा सुदर्शन राव बिराजदार सर यांच्या प्रमुख उपस्थितीतही बैठक संपन्न झाली.

या बैठकीला मार्गदर्शन करताना लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार सर म्हणाले की, एकेकाळी खुप वैभवशाली व नावारूपात असलेला वीरशैव लिंगायत समाज आज अडचणीत आला आहे.आज लिंगायत समाजाची सर्व स्तरांवर पिछेहाट होत आहे.

शिक्षणात, नौकरीत, व्यापारात, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक, धार्मिक सर्वच ठिकाणी आमचा आलेख हा खाली जात आहे.या पिछेहाटीला जबाबदार लिंगायत समाजातील राजकिय पुढारी व काही धर्मगुरू जबाबदार आहेत.

नेत्यांना पदे मिळवून सत्ता, संपत्ती मिळवायची आहे.जन्मभर सत्तेचे पदे स्वतः घ्या घरात ठेवायची आहेत. त्यासाठी समाजाचा फक्त वापर करतात वापर झाल्यानंतर समाजाला ढुंकुनही विचारत नाहीत. धर्मगुरुनांही पोथी पुराणाशिवाय काही देणे घेणे नाही. आणि या मंडळींवर विश्वास ठेवुनी समाज जगतोय ही खुप मोठी शोकांतिका आहे. यांच्या भरवशावर राहिल्याने समाजाला ओहोटी लागलीआहे. बंधुंनो ईथुन पुढे येणारा काळ व वेळ खुप वाईट आहे.

आतांच सावध व्हा,आपला विकास आपण करण्यासाठी तयार व्हा. संघटीत व्हा एक व्हा.एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी व्हा. तुम्हाला कोणीही आडवे येणार नाही. ज्या ठिकाणी तुम्हाला अडचण आली तिथे संघटना तुमच्यासोबत आहे. असे मत बिरादार सरांनी मांडले. या वेळी त्यांनी लिंगायत महासंघाच्या अतनुर शाखेची स्थापना केली व सुधाकर मुगदाळे यांची अध्यक्षपदी निवड करुन त्यांच्या पंधरा लोकांच्या कार्यकारिणीला मान्यता दिली.

या कार्यक्रमाला लिंगायत महासंघाचे उदगीर शहराध्यक्ष भीमाशंकर शेळके, तसेच जळकोट तालुकाध्यक्ष शंकरराव धूळशेट्टे, तालुकासहसचिव बालाजी शिवशेट्टे, हणमंत भरडे, तालुका उपाध्यक्ष विजयकुमार कापसे, उदगीरचे बापुराव शेटकार, नळगीरचे माधवराव निंगदाळे गुरुजी, जळकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव गंगाधर सिद्धेश्वरे, प्राचार्य दत्तात्रय हाम्पल्ले, किशन मुंगदळे, बसवेश्वर सोप्पा, प्रदीप काळे, यांच्यासह अनेक मान्यवरांसह सुधाकर मुंगदळे, बाळू सासट्टे, शिवराज रेड्डी, रवी कुमार कल्पे, महावीर बिचकुंदे, दत्तात्रेय गळगे, विश्वनाथ हिंगणे, पांडुरंग कापसे, बाबुराव पंचगल्ले गुरुजी, मनोहर मुगदळे, किशन मुगदळे, विजयकुमार कापसे, उमाकांत बिचकुंदे, बाबुराव कापसे, माधव रेड्डी आदी नुतन पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीसाठी जळकोट तालुक्यातील तसेच आतनूर गावातील व आजुबाजूच्या गावातील लिंगायत समाज बांधवांनी, महिलांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

# मच्छीमार बांधवांना मिळणार पाच लाखांचा मोफत विमा



**कन्नड (अरुण थोरात):** नेवपूर मध्यम प्रकल्प ता.कन्नड येथे मत्स्यव्यवसाय विभागा मार्फत नेवपूर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या सर्व मच्छिमारांचा पाच लाख रुपयांचा अपघात विमा काढण्यात आला आहे अशी माहिती देण्यात आली आहे. तसेच याबाबत एन.एफ.डी.पी कॅम्प घेउन क्रियाशील सभासदांची पाहणी करण्यात आली. या एन.एफ.डी.पी च्या माध्यमातून जे खरोखर मासेमारी व्यवसाय करतात व क्रियाशील सभासद आहेत.

त्यांना या पुढे मिळणाऱ्या केंद्र व राज्य शासनाचा योजनाचा लाभ दिला जाणार आहे. यावेळी नेवपूर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे चेअरमन तुकाराम वानखेडे, छ. संभाजीनगरच्या सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्त माधुरीमा जाधव, श्रीमती सना पटेल (सहाय्यक मत्स्य विकास अधिकारी ), कर्मचारी अविनाश कोलते हे उपस्थित होते.

तसेच महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघांचे संचालक तुकाराम वानखेडे यांनी सर्व मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना आणि मच्छिमारांना आव्हान आहे कि, सर्वांनी मत्स्य व्यवसाय विभागाला सहकार्य करून आप आपला व आपल्या संस्थेच्या सभासदांचा मोफत पाच लाख रुपयांचा अपघात विमा काढून घ्यावा, लक्ष्मण वाल्डे यांनी भोई समाज - त्याच जगणं आणि त्याचे प्रश्न या लेखांतून मच्छीमारासांठी मोफत विमा असावा अशी मागणी व्यक्त केली होती आणि योगायोगाने ती मागणी मान्य झाली. समस्त मच्छीमार संघटनांना त्यांचा हक्काच मिळालेलं हे यश मानले जात आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जानेवारी २०२५


## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले याविषयी माहिती सांगितली सावित्रीबाई फुले यांच्या वेशात मुली शाळेत उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बेबी माळोदे यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मनीषा शिंदे होत्या. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अर्चना भारद्वाज यांनी मानले. सर्जेराव वाघ, वसंत राठोड, शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे, संदीप चव्हाण, मंगल तारो, जाहेद खान पठाण, सुनिता भोसले, रवींद्र खापे यांनी परिश्रम घेतले

## माजी महापौर नंदकुमार घोडेले आणि अनिता घोडेले एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत



**छत्रपती संभाजीनगर :** ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. शहराचे माजी महापौर, माजी खासदार व शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचे निकटवर्तीय मानले जाणारे नंदकुमार घोडेले आणि माजी महापौर अनिता घोडेले यांनी शिवसेनेत प्रवेश केल्याची माहिती आहे.

विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात एकही लोकप्रतिनिधी नसणाऱ्या उद्धवसेनेला मनपा निवडणुकीच्या आधी मोठा धक्का बसला आहे. घोडेले हे उद्धवसेनेतील प्रमुख नेते अशी त्यांची ओळख आहे.

महापालिका निवडणुकीच्या तोंडावर त्यांचे पक्षांतर उद्धवसेनेसाठी धक्कादायक मानले जात आहे. शिंदेसेनेत त्यांना संघटनेमध्ये मोठे पद व त्याशिवाय मोठी जबाबदारी मिळणार असल्याची चर्चा आहे. ही मागणी मान्य झाल्यानेच त्यांनी पक्षात प्रवेश केल्याचे म्हटले आहे.

नंदकुमार घोडेले हे शिवसेनेचे एकनिष्ठ नेते म्हणून ओळखले जातात. ते माजी महापौर देखील राहिले आहेत. तर त्यांच्या पत्नी अनिता घोडेले या देखील महापौर राहिल्या आहेत. घोडेले हे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचे अत्यंत विश्वासू मानले जातात. १ तारखेला चंद्रकांत खैरे यांच्या वाढदिवसानिमित्त धार्मिक कार्यक्रमात नंदकुमार घोडेले हे त्यांच्यासोबत दिसून आले. यामुळे आता चंद्रकांत खैरे काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






## अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रकला पकडले



**नागपूर :** येथे अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रक पकडण्यात आले आहे. हा ट्रक मुख्य राष्ट्रीय महामार्ग सोडून आडमार्गाने जात असताना पकडण्यात आला आहे. हा ट्रक आडमार्गाने मध्यप्रदेशमध्ये जात होता. रॉयल्टी वाचवण्यासाठी या मार्गाचा वापर केला जात होता. यात भाजप आमदार आशिष देशमुख यांनी तसेच भाजप पदाधिकाऱ्यांनी ट्रक पकडण्यात मदत केली आहे.

भाजप आमदार आशिष देशमुख व स्थानिक भाजप पदाधिकारी यांनी अवैध वाळू पकडण्यास पुढाकार घेतला आहे. यांच्या पुढाकाराने राख आणि सुपारी माफियांचे हे अवैध वाहतूक करणारे ट्रक पकडण्यात आले आहे. हा ट्रक पकडताना आमदार आशिष देशमुख हे थेट ट्रकवर चढले. यवेळी त्यांनी ट्रकमध्ये असलेल्या मालाची पाहणी केली. तेव्हा अवैध वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले.

मध्यप्रदेशमध्ये जाताना राष्ट्रीय महामार्गाचा वापर न करता हा ट्रक आडमार्गाने जात होता. त्यामुळे संशय येऊन ही कारवाई करण्यात आली. रॉयल्टी वाचवत मध्यप्रदेशला जात असतानाच ही कारवाई करण्यात आली आहे. यावर आशिष देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अवैधरित्या वाहतूक चावळी मोहतकरमार्गे मध्यप्रदेशला सुरु आहे. नक्कीच त्याच्यामध्ये गौडबंगाल आहे, असे त्यांनी म्हंटले आहे.

आशिष देशमुख म्हणाले, हे रॉयल्टी वाचवत आहेत. ओव्हरलोड गाड्या चालवत आहेत. सोबतच टोल देखील अवैधरीत्या वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. या माध्यमातून ग्रामीण रस्ते खराब करण्याचे काम देखील हे लोक करत असल्याचा आरोप देशमुख यांनी केला आहे. याचा पर्दाफाश करण्यासाठी मी पोलिसांना सांगितलेले आहे. त्या पद्धतीने सुपारी आणि तंबाखू देखील वाहतूक होत आहे. लाखो रुपयांचा कर चुकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. यांच्यावर कारवाई करण्याची मागणी देखील आता आम्ही केली आहे.